लोकमत
# हॅलो जालना
औरंगाबाद, सोमवार, दि. १३ ऑगस्ट २०१८

लोकमत



**यश...** मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या यांत्रिकी विभागाच्या २५ विद्यार्थ्यांच्या टीम व्हेलरने पहिल्यांदाच बी.एफ.के.सी.च्या राष्ट्रीय स्पर्धेत आठवा क्रमांक पटकावला.

Hello Jalna
Page No. 4 Aug 13, 2018
Powered by: erelego.com

लोकमत

# मत्स्योदरी अभियांत्रिकीचे यश

## टीम व्हेलर : देशभरातील १२० संघातून मिळविला आठवा क्रमांक

लोकमत न्यूज नेटवर्क

**जालना :** देशपातळीवर भरविण्यात आलेल्या प्रदर्शनात मत्स्योदरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या यांत्रिकी विभागाच्या २५ विद्यार्थ्यांनी 'टीम व्हेलर'चे पहिल्यांदाच भारत फॉर्म्युला स्पर्धेत सादरीकरण केले. देशभरातून १२० संघाने या स्पर्धेत सहभाग नोंदविला होता. त्यात जालन्याने आठवा क्रमांक मिळविला आहे.

संघ प्रमुख विवेक खंडेलवाल, व्यवस्थापक प्रतीक श्रीपत, हार्दिक एल्गलवार, महेश ठोंबरे, मिलिंद राजळे, अजय देशमुख, चालक गौरव पाण्डेय यांच्यासह सर्व विद्यार्थ्यांनी,




तसेच प्राध्यापक प्रा. स्वप्नील ढोले, प्रा. प्रफुल्ल ठाकरे यांच्या परिश्रमातून ही गाडी तयार करण्यात आली. बी.एफ.के.सी.टी.च्या दिलेल्या माहिती पुस्तिकेद्वारे निर्मित या गाडीमध्ये चेसिस, ट्रान्समिशन, ब्रेकिंग, स्टेअरिंग, डिझाईन व फॅब्रिकेशन या वेगवेगळ्या भागांमध्ये विद्यार्थ्यांनी स्वत: भाग बनवून व त्यांची जोडणी करून गाडी बनविली. तत्पूर्वी या सर्व भागांचे विविध सॉफ्टवेअरद्वारे डिझाईन व विश्लेषण करून हे सर्व भाग तयार केले आहेत. या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

◆ टीम व्हेलरच्या या यशाबद्दल मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आ. राजेश टोपे, सचिव मनीषा टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार, उपप्राचार्य व विभाग प्रमुख प्रा. आर. एल. करवंदे, शाम भोजने, सर्व विभाग प्रमुख सर्व प्राध्यापकांनी स्वागत केले.

Hello Jalna
Page No. 4 Aug 13, 2018
Powered by: erelego.com

दैनिक आनंद नगरी
जालना नगरी
सोमवार, दि. १३ ऑगस्ट २०१८

दैनिक आनंद नगरी
जालना नगरी
Monday 2018/08/13

# मत्स्योदरी अभियांत्रिकीच्या टीम व्हेलरचा राष्ट्रीय स्पर्धेत आठवा क्रमांक



जालना (प्रतिनिधी)- मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या यांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांच्या 'टीम व्हेलर'चे पहिल्यांदाच भारत फॉर्मुला कार्टिंग पॉवर्ड बाय कॅड टेकनॉलॉजी (बी.एफ.के.सी.टी.), कोईम्बतूर, तामिळनाडूच्या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेमध्ये संपूर्ण भारतामधून आलेल्या संघांमधून आठवा क्रमांक पटकाविला.

या टिममध्ये २५ मुले व मुलींचा समावेश होता. प्राध्यापक मार्गदर्शक प्रा.स्वप्नील ढोले, प्रा.प्रफुल्ल ठाकरे यांच्या अथक परिश्रमातून हि गाडी साकार झाली. बी.एफ.के.सी.टी.च्या दिलेल्या माहिती पुस्तिकेद्वारे निर्मित या गाडीमध्ये चेसिस, ट्रान्समिशन, ब्रेकिंग, स्टेअरिन्ग, डिझाईन व फॅब्रिकेशन या वेगवेगळ्या भागांमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः भाग बनवून व त्यांची जोडणी करून गाडी गाडी बनविली आहे. तत्पूर्वी या सर्व भागांचे विविध सॉफ्टवेअर द्वारे डिझाईन व विश्लेषण करून हे सर्व भाग मॅनुफॅक्चर केले आहेत. या गाडीसाठी भाईश्री, विक्रम टी प्रा. ली., कालिका स्टील अलॉय प्रा. ली., मेटॅरोल्स अँड कमोडिटी प्रा. ली. (राजुरी ग्रुप), एस. आर. जे. पित्ती स्टील्स प्रा. ली., डॉ.आदिनाथ पाटील, वरद ड्रेसेस, आस्था हॉस्पिटल हे प्रायोजक लाभले होते.टीम व्हेलरच्या या उतुंग यशाबद्दल मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आ.राजेश टोपे, सचिव सौ.मनीषाताई टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ.बी. आर. गायकवाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार, उपप्राचार्य व यांत्रिकी विभाग प्रमुख प्रा. आर. एल. करवंदे, श्री. शाम भोजने, सर्व विभाग प्रमुख, सर्व प्राध्यापक, सहकारी वर्ग यांनी अभिनंदन केले.

पुढारी

स्ट २०१८




**यांनी घेतले परिश्रम** संघ प्रमुख विवेक खंडेलवाल, व्यवस्थापक प्रतीक श्रीपत, हार्दिक एल्गलवार, महेश ठोंबरे, मिलिंद राजळे, अजय देशमुख, गाडीचालक गौरव पांडेय यांच्यासह इतर विद्यार्थी तसेच प्राध्यापक मार्गदर्शक प्रा.स्वप्निल ढोले, प्रा. प्रफुल्ल ठाकरे यांच्या अथक परिश्रमातून ही रेसिंग कार्ट साकार झाली.या रेसिंग कार्टसाठी भाईश्री, विक्रम टी प्रा. ली., कालिका स्टील अलॉय प्रा. ली., मेटॅरोल्स अँड कमोडिटी प्रा. लि. (राजुरी ग्रुप), एस. आर. जे. पित्ती स्टील्स प्रा. ली., डॉ.आदिनाथ पाटील, आस्था हॉस्पिटल हे प्रायोजक लाभले.

२५ विद्यार्थी टीम

१२० संघातून ८ वा क्र.



पुढारी

# 'टीम व्हेलर' राष्ट्रीय स्पर्धेत आठवा

**जालना : प्रतिनिधी**

मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या यांत्रिकी विभागाच्या २५ विद्यार्थ्यांच्या टीम व्हेलरने पहिल्यांदाच तामीळनाडूच्या कोईम्बतूर येथे घेण्यात आलेल्या भारत फॉर्मुला कार्टिंग पॉवर्ड बाय कॅड टेक्नॉलॉजी (बी.एफ.के.सी.टी.)या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेमध्ये संपूर्ण भारतामधून आलेल्या १२० संघांमधून आठवा क्रमांक पटकाविला.

मत्स्योदरीच्या अभियांत्रिकी विद्यालयातील अंतिम व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी डिस्कवर मोटारसायकलचे इंजीन वापरून फार्म्युला वन रेसिंग कारमध्ये वापरल्या जाणाऱ्या कारप्रमाणे कार तयार केली.बी.एफ.के.सी.टी.च्या दिलेल्या माहिती पुस्तिकेद्वारे निर्मित या कारमध्ये चेसिस, ट्रान्समिशन, ब्रेकिंग, स्टेअरिन्ग, डिझाईन व फॅब्रिकेशन या वेगवेगळ्या प्रकारचे सुटे भाग विद्यार्थ्यांनी स्वतः भाग बनवून व त्यांची जोडणी करून गाडी बनविली आहे. तत्पूर्वी या सर्व भागांचे विविध सॉफ्टवेअरद्वारे डिझाईन व विश्लेषण करून हे सर्व भाग तायार करण्यात आले.या विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.




जालना : मत्स्योदरी अभियांत्रिकी टीम व्हेलरचे सदस्य.

जालना TODAY सकाळ
रविवार
१२ ऑगस्ट २०१८
कमाल किमान
29.0°/23.0° C

सकाळ

# 'मत्स्योदरी'च्या विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय स्पर्धेत यश

जालना, ता. ११ : मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या यांत्रिकी विभागाच्या २५ विद्यार्थ्यांच्या टीम व्हेलरचा राष्ट्रीय स्पर्धेत आठवा क्रमांक आला आहे. राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेमध्ये संपूर्ण भारतामधून आलेल्या १२० संघांमधून आठवा क्रमांक पटकावला. या संघात संघप्रमुख विवेक खंडेलवाल, व्यवस्थापक प्रतिक श्रीपत, हार्दिक एल्गलवार, महेश ठोंबरे, मिलिंद राजळे, अजय देशमुख, गाडीचालक गौरव पांडेय यांच्यासह सर्व विद्यार्थी; तसेच मार्गदर्शक प्राध्यापक प्रा. स्वप्नील ढोले, प्रा. प्रफुल्ल ठाकरे यांचे संस्थेचे अध्यक्ष आमदार राजेश टोपे, सचिव मनीषा टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार, उपप्राचार्य व यांत्रिकी विभागप्रमुख प्रा. आर. एल. करवंदे आदींनी अभिनंदन केले.

Aurangabad, Jalna-Today
12/08/2018 Page No. 4

औरंगाबाद Live

देशोन्नती मंगळवार, दि. १४ ऑगस्ट २०१८

# मत्स्योदरी अभियांत्रिकीच्या 'टीम व्हेलर' चा राष्ट्रीय स्पर्धेत आठवा क्रमांक



**प्रतिनिधी/१३ ऑगस्ट**

**जालना :** मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या यांत्रिकी विभागाच्या २५ विद्यार्थ्यांच्या 'टीम व्हेलर' चे पहिल्यांदाच भारत फॉर्मुला कार्टिंग पॉवर्ड बाय कॅड टेक्नॉलॉजी (बी.एफ.के.सी.टी.), कोईम्बतूर, तामिळनाडूच्या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेमध्ये संपूर्ण भारतामधून आलेल्या १२० संघांमधून आठवा क्रमांक पटकाविला.

सर्व विद्यार्थ्यांनी, तसेच प्राध्यापक मार्गदर्शक प्रा.स्वप्नील ढोले, प्रा.प्रफुल्ल ठाकरे यांच्या अथक परिश्रमातून हि गाडी साकार झाली. एफ.के.सी.टी.च्या दिलेल्या माहिती पुस्तिकेव्दारे निर्मित या गाडीमध्ये चेसिस, ट्रान्समिशन, ब्रेकिंग, स्टेअरिन्ग, डिझाईन व फॅब्रिकेशन या वेगवेगळया भागांमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः भाग बनवून व त्यांची जोडणी करून गाडी गाडी बनविली आहे. तत्पूर्वी या सर्व भागांचे विविध सॉफ्टवेअर द्वारे डिझाईन व विश्लेषण करून हे सर्व भाग मॅनुफॅक्चर केले आहेत.

या गाडीसाठी डॉ.आदिनाथ पाटील लाभले होते. टीम व्हेलर च्या या उतुंग यशाबद्दल मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेश टोपे, सचिव सौ.मनीषाताई टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार, उपप्राचार्य व यांत्रिकी विभाग प्रमुख प्रा. आर. एल. करवंदे, शाम भोजने, सर्व विभाग प्रमुख, सर्व प्राध्यापक, सहकारी वर्ग यांनी अभिनंदन केले.

दैनिक
# समर्थ दर्पण
संपादकः प्रमोद तोतला
अंक : ५४ वा * बुधवार दि. १५ ऑगस्ट २०१८ * Title Code: MAHMAR49345 *

# मत्स्योदरी अभियांत्रिकीच्या टीम व्हेलर चा राष्ट्रीय स्पर्धेत आठवा क्रमांक

जालना (प्रतिनिधी)- मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या यांत्रिकी विभागाच्या २५ विद्यार्थ्यांच्या टीम व्हेलर चे पहिल्यांदाच भारत फॉर्मुला कार्टिंग पॉवर्ड बाय कॅड टेकनॉलॉजी (बी.एफ.के.सी.टी.), कोईम्बतूर, तामिळनाडूच्या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेमध्ये संपूर्ण भारतामधून आलेल्या १२० संघांमधून आठवा क्रमांक पटकाविला.

संघ प्रमुख विवेक खंडेलवाल, व्यवस्थापक प्रतीक श्रीपत, हार्दिक एल्लावार, महेश ठोंबरे, मिलिंद राजळे, अजय देशमुख, दुर्गेश काबरे, गाडीचालक गौरव पाण्डेय व बाकी सर्व विद्यार्थ्यांनी, तसेच प्राध्यापक मार्गदर्शक प्रा.स्वप्नील ढोले, प्रा.प्रफुल्ल ठाकरे यांच्या अथक परिश्रमातून हि गाडी साकार झाली. बी.एफ.के.सी.टी.च्या दिलेल्या माहिती पुस्तिकेद्वारे निर्मित या गाडीमध्ये चेसिस, ट्रान्समिशन, ब्रेकिंग, स्टेअरिन्ग, डिझाईन व फॅब्रिकेशन या वेगवेगळ्या भागांमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः भाग बनवून व त्यांची जोडणी करून गाडी गाडी बनविली आहे. तत्पूर्वी या सर्व भागांचे विविध सॉफ्टवेअर द्वारे डिझाईन व विश्लेषण करून हे सर्व भाग मॅनुफॅक्चर केले आहेत. या गाडीसाठी भाईश्री, विक्रम टी प्रा. ली., कालिका स्टील अलॉय प्रा. ली., मेटॅरोल्स अँड कमोडिटी प्रा. ली. (राजुरी ग्रुप), एस. आर. जे. पित्ती स्टील्स प्रा. ली., डॉ.आदिनाथ पाटील, आस्था हॉस्पिटल, वरद ड्रेसेस हे प्रायोजक लाभले होते. टीम व्हेलर च्या या उतुंग यशाबद्दल मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.ना. राजेशभैय्या टोपे, सचिव सौ.मनीषाताई टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ.बी. आर. गायकवाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार, उपप्राचार्य व यांत्रिकी विभाग प्रमुख प्रा. आर. एल. करवंदे, श्री. शाम भोजने , सर्व विभाग प्रमुख, सर्व प्राध्यापक, सहकारी वर्ग यांनी अभिनंदन केले.

सकाळ

# जालना

सकाळ

सकाळ औरंगाबाद, मंगळवार, २८ ऑगस्ट २०१८

सकाळ

# विद्यार्थ्यांनी बनविली फॉर्म्युला कार

## 'मत्स्योदरी अभियांत्रिकी'च्या २५ विद्यार्थ्यांचा यशस्वी प्रयोग

**आकाश गायकवाड**

जालना, ता. २७ : शहरातील मत्स्योदरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या २५ विद्यार्थ्यांनी एकत्र येत एका 'टीम व्हेलर फॉर्म्युला' कारची निर्मिती केली आहे. तमिळनाडूमध्ये पार पडलेल्या एका राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत या कारने आठवा क्रमांक पटकावल्याने विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

आर्थिक संकटावर मात करीत अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी फॉर्म्युला कारचा यशस्वी प्रयोग केला. या कार उभारणीला शहरातील अनेक उद्योजकांनी सहकार्य केले. अभियांत्रिकीच्या एका माहिती पुस्तिकेचा आधार घेत विद्यार्थ्यांनी चेसिस, ट्रान्समिशन, स्टेअरिंग, डिझाईन व फॅब्रिकेशन अशी विविध भागांची निर्मिती केली; तसेच विविध भागांच्या जोडणीचे सॉफ्टवेअरद्वारे डिझाईन व विश्लेषण करून ही कार बनविण्यात आली आहे. दरम्यान, तमिळनाडूतील कोईम्बतूर येथे नुकत्याच पार परलेल्या राष्ट्रीय स्तरावरील कॅड टेक्नॉलॉजी स्पर्धेत या कारने आठवा क्रमांक पटकावला. या स्पर्धेत १२० संघ सहभागी झाले होते. प्राचार्य डॉ. एस. के बिरादार, प्रा. स्वप्नील ढोले आणि प्रा. प्रफुल्ल ठाकरे यांच्या मार्गदर्शनात विवेक खंडेलवाल, प्रतीक श्रीपत, हार्दिक एल्गलवार, महेश ठोंबरे, मिलिंद राजळे, अजय देशमुख, गौरव पाण्डेय व इतर विद्यार्थ्यांनी ही कार साकारली आहे.




**जालना : मत्स्योदरी अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेली टीम व्हेलर फॉर्म्युला कार.**



**प्रथम 'टीम व्हेलर'ची निर्मिती करण्याऱ्या टीमचे अभिनंदन. तीन महिने अथक परिश्रम घेत विद्यार्थ्यांनी कारचे मॉडेल साकारले आहे. स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी स्वतःचे वर्चस्व सिद्ध करायला हवे.**
**- डॉ. एस. के बिरादार, प्राचार्य, मत्स्योदरी महाविद्यालय, जालना**

# 'मत्स्योदरी'च्या विद्यार्थ्यांनी बनवली 'टिम व्हेलर'




**जालना/प्रतिनिधी**

मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या यांत्रिकी विभागाच्या २५ विद्यार्थ्यांच्या 'टीम व्हेलर' चे पहिल्यांदाच कोईम्बतूर (तामिळनाडू) येथे कॅड टेक्नालॉजी (बी.एफ.के.सी.टी.) राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेमध्ये संपूर्ण भारतामधून आलेल्या १२० संघांमधून आठवा क्रमांक पटकाविला.

संघ प्रमुख विवेक खंडेलवाल, व्यवस्थापक प्रतीक श्रीपत, हार्दिक एल्गलवार, महेश ठोंबरे, मिलिंद राजळे, अजय देशमुख, दुर्गेश काबरे, गाडीचालक गौरव पाण्डेय व बाकी सर्व विद्यार्थ्यांनी, तसेच प्राध्यापक मार्गदर्शक प्रा.स्वप्नील ढोले, प्रा.प्रफुल्ल ठाकरे यांच्या अथक परिश्रमातून हि गाडी साकार झाली.

बी.एफ.के.सी.टी.च्या दिलेल्या माहिती पुस्तिकेद्वारे निर्मित या गाडीमध्ये चेसिस, ट्रान्समिशन, ब्रेकिंग, स्टेअरिन्ग, डिझाईन व फॅब्रिकेशन या वेगवेगळ्या भागांमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः भाग बनवून व त्यांची जोडणी करून गाडी बनविली आहे. तत्पूर्वी या सर्व भागांचे विविध सॉफ्टवेअरद्वारे डिझाईन व विश्लेषण करून हे सर्व भाग उत्पादीत केले आहेत.

या गाडीसाठी भाईश्री, विक्रम टी प्रा. ली., कालिका स्टील अलॉय प्रा. ली., मेटॅरोल्स अँड कमोडिटी प्रा. ली. (राजुरी ग्रुप), एस. आर. जे. पित्ती स्टील्स प्रा. ली., डॉ.आदिनाथ पाटील, आस्था हॉस्पिटल, वरद ड्रेसेस हे प्रायोजक लाभले होते.

टीम व्हेलर च्या या उतुंग यशाबद्दल मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आ. राजेश टोपे, सचिव सौ.मनीषाताई टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार, उपप्राचार्य व यांत्रिकी विभाग प्रमुख प्रा. आर. एल. करवंदे, शाम भोजने, सर्व विभाग प्रमुख, सर्व प्राध्यापक, सहकारी वर्ग यांनी अभिनंदन केले.

माझा मराठवाडा
औरंगाबाद
सोमवार, १० सप्टेंबर २०१८

आजचे तापमान ▶ नांदेड ▲ ३२.० ▼ २१.० • परभणी ▲ ३२.५ ▼ १९.९ • हिंगोली ▲ ३२.६ ▼ २०.० • लातूर ▲ ३१.० ▼ १९.६

# भावी अभियंत्यांनी केवळ सव्वा लाखात तयार केली रेसिंग कार

## चॅलेंज २०१८ : डिझाइन व सुट्या भागांचीही केली निर्मिती, ताशी ७३ किलोमीटर वेग

प्रताप गाढे । जालना

देखणे डिझाइन, त्याला दोन स्पार्क असलेले १२५ सीसीचे इंजीन आणि तासाला ७३ किलोमीटरचा वेग असे फीचर्स असलेली रेसिंग कार सध्या युवकांचे आकर्षण ठरली आहे. एखाद्या नामांकित कंपनीच्या रेसिंग कारच्या तोडीस तोड अशी टीम व्हेलर फॉर्म्युला वन रेसिंग कार तयार केली आहे मत्स्योदरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी. विशेष म्हणजे या विद्यार्थ्यांनी अगोदर या कारचे डिझाइन तयार केले. त्यानंतर त्यासाठी आवश्यक स्पेअर पार्ट (सुट्या भागांची) निर्मिती केली. आता ही कार हैदराबाद येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उतरवली जाणार आहे.

अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक शिक्षणासाठी अशा प्रकारच्या विविध यंत्रांची निर्मिती करावी लागते. त्याचाच एक भाग म्हणून मत्स्योदरी महाविद्यालयातील मॅकेनिकल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी एफ वन रेसिंग कार तयार करण्याचे ध्येय समोर ठेवले. त्यासाठी त्यांनी सलग तीन महिने परिश्रम घेतले. त्यातून ही अनोखी रेसिंग कार साकारली आहे. राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत उतरवण्यासाठी त्यांनी ही कार तयार केली. त्यासाठी त्यांनी या स्पर्धेच्या अटींची माहिती घेतली व त्यानुसार काम सुरू केले. साधारणपणे अशा स्पर्धांसाठी विद्यार्थी सध्या अस्तित्वात असलेल्या रेसिंग कारचीच कॉपी करतात. मात्र येथील २५ विद्यार्थ्यांनी स्वतःची संकल्पना वापरून मनासारखी कार तयार केली. सुरुवातीला त्यांनी विशेष सॉफ्टवेअरच्या मदतीने कारचे डिझाइन तयार केले. ते करताना त्यांनी फॉर्म्युला रेसिंग कारच्या सर्व नियमांचे पालन केले. त्यानुसारच कारचे चेसिस, ट्रान्समिशन, ब्रेकिंग, स्टेअरिंग डिझाइन व फॅब्रिकेशन असे विविध पार्ट जोडले आहेत. १०६ किलो वजनाची ही कार पेट्रोलवर धावते. त्याची चाचणीही यशस्वी झाली आहे. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या "टीम व्हेलर" ने भारत फॉर्म्युला कार्टिंग पॉवर्ड बाय कॅड टेक्नॉलॉजी (बी.एफ.के.सी.टी.) या तामिळनाडूच्या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत देशभरातील १२० संघांमधून आठवा क्रमांक पटकावला.




अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेली रेसिंग कार.

**अशी होती टीम :** संघ प्रमुख विवेक खंडेलवाल, व्यवस्थापक प्रतीक श्रीपत, हार्दिक एल्गलवार, महेश ठोंबरे, मिलिंद राजळे, अजय देशमुख, दुर्गेश काबरे, गाडीचालक गौरव पाण्डेय व इतर विद्यार्थ्यांनी ही कार तयार केली. त्यांना प्रा.स्वप्निल ढोले, प्रा.प्रफुल्ल ठाकरे यांनी मार्गदर्शन केले. तर संस्थेचे अध्यक्ष आ. राजेश टोपे, सचिव मनीषा टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ.बी.आर. गायकवाड, प्राचार्य डॉ.एस.के.बिरादार आदींनी या उपक्रमासाठी सहकार्य केले.

### चॅलेंज २०१८ चे लक्ष्य

भारत फॉर्म्युला कार्टी पॉवर्ड बाय कॅड टेक्नॉलॉजी या तामिळनाडूच्या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवून देशभरातील १२० संघांमधून आठवा क्रमांक पटकावला. आता हैदराबाद येथे होणारी स्टुडंट कार्ट डिझाइन चॅलेंज २०१८ ही स्पर्धा लक्ष्य असणार आहे.

### स्पर्धेतून सुचली संकल्पना

अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना अंतर्गत देश पातळीवर होणाऱ्या स्पर्धेसाठीच रेसिंग कारची संकल्पना सूचली. ही कार वेगळी असेल, असा या विद्यार्थ्यांचा प्रयत्न होता. त्यामुळे अनेक रेसिंग कारचा अभ्यास करून त्यांनी या कारची निर्मिती केली आहे.